आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र – दुपारी ४.०० वाजता

८ ऑक्टोबर २०२३ – रविवार

भारतीय हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापन दिनाचा मुख्य सोहळा आज उत्तर प्रदेशात प्रयागराजच्या बमरौली तळावर झाला. हवाई दलप्रमुख एअर चीफ मार्शल व्ही.आर. चौधरी यांनी यानिमित्त आयोजित संचलनाची पाहणी केली. संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान आणि इतर मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

यावेळी एअर चीफ मार्शल व्ही. आर. चौधरी यांनी हवाई दलाच्या नव्या बोधचिन्हांकीत ध्वजाचं अनावरण केलं. यावेळी जुना बोधचिन्हांकीत ध्वज सन्मानपूर्वक उतरवून हवाई दलप्रमुखांकडे सुपूर्द केला गेला. आता हा जुना बोधचिन्हांकीत ध्वज हवाईदलाच्या वस्तुसंग्रहालयात ठेवला जाणार आहे. यंदाची हवाई दलाची संकल्पना “हवाई ताकद - सीमापार” अशी आहे.

मुंबईत यानिमित्तानं आयोजित केलेल्या समारंभाला राज्यपाल रमेश बैस प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हवाई दल केवळ आकाशातून संरक्षण करत नाही तर देशाच्या कोणत्याही भागाला नैसर्गिक आपत्तीचा तडाखा बसला तर तात्काळ धावून जातं, असं एअर व्हाईस मार्शल रजत मोहन यांनी सांगितलं. हवाई दलाच्या ९१ व्या वर्धापनदिनानिमीत्त राष्ट्रपती, प्रधानमंत्री, संरक्षणमंत्री आणि केंद्रीय गृहमंत्र्यांनी भारतीय हवाई दलाचे सर्व जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड इथं दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयाचं उद्घाटन आज सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या हस्ते झालं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाला उपस्थित होते. न्यायालयाच्या नवीन इमारतीचा कोनशिला समारंभही त्यांच्या

उपस्थितीत झाला. यावेळी बोलताना फडणवीस म्हणाले, की सध्या प्रलंबित खटल्यांचं आव्हान सगळ्यात महत्त्वाचं आहे. तंत्रज्ञानाचा वापर केला तर न्यायदानावरचा भार कमी करता येऊ शकतो. न्यायदान यंत्रणा अधिक वेगाने कशी करता येईल, याचा प्रयत्न आहे. सरकार आणि न्यायालय यांनी एकत्रितपणे काम केलं, तर ती प्रक्रिया गतिशील होऊ शकेल.'

मंडणगड तालुक्यातल्या आंबडवे या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ गावी त्यांचं यथोचित स्मारक उभारण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचंही फडणवीस यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

जीएसटी आकारणी विरोधात अपील करण्याची मुदत येत्या ३१ जानेवारी पर्यंत वाढवण्यात आली आहे. वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५२व्याबैठकीत काल हा निर्णय घेण्यात आला. परिषदेच्या बावन्नाव्या परिषदेत करदात्यांना यावर्षी मार्चअखेर कर अधिकाऱ्यांनी दिलेल्या मागणी आदेशावर येत्या ३१ जानेवारीपर्यंत अपील दाखल करण्याची सवलत काल देण्यात आली. जीएसटी कायद्यानुसार मागणी आदेशानंतर तीन महिन्याच्या आत करदात्याने अपील दाखल करायचे असते. ही मुदत वाढवल्यामुळं अनेक करदात्यांची सुविधा होणार आहे. तात्पुरत्या स्वरुपात मालमत्ता ताब्यात घेतली असेल तर एक वर्षानंतर ती मुक्त करण्याची तरतूदही कालच्या बैठकीत करण्यात आली. जीएसटी भरला नाही तर बँक खात्यांसह मालमत्ता तात्पुरती ताब्यात घेण्याचा अधिकार कर अधिकाऱ्यांना दिलेला आहे.

**<><><><><>**

हमास या दहशतवादी संघटनेनं इस्त्रायलवर केलेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, आखाती देशांमधल्या परिस्थितीच्या मुद्यावर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेची विशेष बैठक आज होणार आहे. हमसच्या हल्ल्यांनंतर इस्त्राएलने युद्ध घोषित करुन प्रतिहल्ले सुरु केले आहेत.

<><><><><>

सर्व एसआरए इमारतींचं स्ट्रक्चरल फायर ऑडिट करण्याची मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्य मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.

मुंबईत गोरेगाव इथं नुकतीच एसआरए इमारतीला आग लागून झालेल्या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू आणि ७० जण जखमी झाले. याप्रकरणी, सखोल चौकशी करुन दोषींवर सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणीही त्यांनी केली. आगीच्या दुर्घटनेनंतर या एसआरए इमारतीतल्या विविध समस्या समोर आल्या आहेत. अनेक एसआरए इमारतींना अधिवास प्रमाणपत्र दिलं असलं तरी, त्या सर्व इमारतींचं फायर ऑडिट झालेलं नाही, असं आठवले यांनी सांगितलं.

गोरेगाव इमारत दुर्घटनेतल्या मृतांच्या कुटुंबांना शासनानं १० लाख रुपयांची मदत द्यावी, तसंच जखमींनाही आर्थिक मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

<><><><><>

हॉंगझू आशियाई क्रीडास्पर्धांचा समारोप आज होणार आहे. भारतीय खेळाडूंनी या स्पर्धांमधे २८ सुवर्ण, ३८ रौप्य आणि ४१ कास्य अशी १०७ पदकांची विक्रमी कामगिरी केली. २०१८च्या जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेत

भारतीय खेळाडूंना एकंदर ७० पदकं मिळाली होती. स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी काल भारतीय खेळाडूंनी एकंदर १२ पदकं मिळवली, त्यापैकी निम्मी सुवर्णपदकं कबड्डी, बॅडमिंटन, हॉकी आणि तिरंदाजी या क्रीडा स्पर्धांमध्ये आहेत. ॲथलेटिक्सने भारताला सर्वाधिक २९ पदकं मिळवून दिली, तर भारतीय नेमबाजांनी देशासाठी एकंदर २२ पदकं जिंकून दिली. आशियाई क्रीडा स्पर्धेत शंभरहून अधिक पदकं जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं आहे. पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे. या स्पर्धेचा समारोप भारतीय वेळेनुसार आज संध्याकाळी साडे पाच वाजता होणार आहे. या कार्यक्रमात भारताचा ध्वज हॉकीपटू पी आर श्रीजेश याच्या हातात असणार आहे.

**<><><><><>**

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पहिला सामना आज ऑस्ट्रेलियाविरुद्ध चेन्नईत सुरु आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी सुरु केली. शेवटची बातमी हाती आली तेव्हा ऑस्ट्रेलियाच्या २६ षटकात २ बाद १०४ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

एसटी महामंडळाच्या शयनयान बसला पुण्याहून नांदेडकडे जाणाऱ्या बीड जिल्ह्यातल्या लिंबागणेश इथं आज सकाळी, बस चालकाचा ताबा सुटल्यानं अपघात झाला. या अपघातात ५ प्रवासी जखमी झाले असून, त्यांना जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. घटनेची माहिती कळताच पोलीस आणि एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

**<><><><><>**

मुंबई गोवा महामार्गावर रत्नागिरीत चरवेली इथं गॅस टँकर उलटून वायुगळती झाल्यामुळे बंद पडलेली वाहतूक पुन्हा सुरू झाली आहे. काल रात्री साडेअकरा वाजता हा टँकर उलटला, त्यानंतर वायुगळती झाल्यानं पोलिसांनी तातडीनं या मार्गावरची वाहतूक बंद करून, ती बावनदीमार्गे वळवली. धोका पूर्ण टळल्यावर साधारण सात तासांनंतर आज सकाळी साडेसहाच्या सुमाराला वाहतूक पुन्हा सुरू केली गेली.

**<><><><><>**

कोल्हापुरचा शाही दसरा उत्सव राज्य शासनानं ‘राज्य महोत्सव’ म्हणून घोषित केला आहे. १५ ते २४ ऑक्टोबर दरम्यान असलेल्या या महोत्सवात विविध सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.